महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १३९ वा दिनांक : २४/०२/२०२५ वार : सोमवार

## ४ वेळा आमदारकी म्हणजे ८ मर्सिडीज दिल्या असतील : नीलम गोऱ्हे यांच्यावर, सुषमा अंधारेंची टीका



**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बोलताना उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करत वादग्रस्त विधान केले आहे. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीझ दिल्या की एक पद मिळायचे, असे विधान त्यांनी केले होते. त्यानंतर ठाकरे गटाच्या नेत्यांनी यावर नाराजी व्यक्त केली आहे. सुषमा अंधारे यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करत नीलम गोऱ्हे यांच्यावर जोरदार टोलेबाजी केली आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या, नीलम गोऱ्हे म्हटल्यानंतर तुम्हाला काय आठवते? एखादी कादंबरी, त्यांनी लिहिलेला वैचारिक ग्रंथ, ललित लेखन, कवितासंग्रह, गेला बाजार एखादा चारोळी संग्रह. त्यांची कोणती साहित्यकृती जास्त गाजली.? हे सगळे विचारण्याचे कारण नुकत्याच झालेल्या साहित्य संमेलनामध्ये नीलम गोऱ्हे यांची एक मुलाखत झाली. राजकारण्यांना बोलावले ही साहित्यिकांची अपरिहार्यता आणि अगतिकता ही झाली आहे. शिवाय राजकारणी लोकांनाही स्वतःला बुद्धिजीवी म्हणून प्रमाणित करून घेण्याची ही नामी संधी असते. त्यामुळे शासकीय खर्चाने होणाऱ्या साहित्य संमेलनातून स्वतःची पाठ थोपटून घ्यायची संधी सोडतील त्या नीलम गोऱ्हे कसल्या, असा टोला सुषमा अंधारे यांनी लगावला आहे.

सुषमा अंधारे पुढे म्हणाल्या, तर नीलम गोऱ्हे साहित्य संमेलनात गेल्या. तिथे जाऊन साहित्याचे जतन संवर्धन यावर त्यांनी काही बोलावे हे अपेक्षितच नाही कारण आडात असेल तर पोहऱ्यात येईल ना? मग त्यांनी म्हटले,"मी पक्षात असताना, म्हणजे नीलम गोऱ्हे पक्षात असताना खूप आर्थिक व्यवहार चालायचे". मला मोठी गंमत वाटली. मला पक्षात येऊन दोन अडीच वर्ष झालीत. नीलम गोरे त्याआधी पंचवीस तीस वर्षे होत्या. अनेक कर्तृत्ववान लोकांच्या संधी हिसकावून घेत चार वेळा आमदारकी भोगली. १८ महिने १३ त्रिकाळ त्या मातोश्रीवरच पडीक असायच्या. मातोश्रीच्या गेटमधून कुणाला आज प्रवेश द्यायचा कुणाला नाही द्यायचा आज कुणाला भेटायला वेळ मिळेल, नाही मिळेल, कुणाची नियुक्ती करायची, सभा संमेलनांना कुठे वेळ द्यायची हे ठरवणाऱ्या नीलम गोऱ्हे.

आता त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जर त्या पक्षात असताना आर्थिक व्यवहार चालायचे तर स्वाभाविक आहे की नियुक्त्या नेमणुका निवडणुकीची तिकीट या सगळ्या प्रक्रियेत नीलम गोऱ्हे होत्या म्हणजे हा सगळा पैसा निलम गोऱ्हेकडे येत असणार? काय केले असेल त्यांनी एवढ्या पैशाचे? परदेशात एखादा बँक खाता असेलच की. आज त्या बोलल्यानंतर, अनेक लोक अगदी शिंदे किंवा भाजपाकडे गेलेले सुद्धा आवर्जून फोन करून सांगत होते की गोऱ्हे वहिनी कशा पद्धतीने निष्ठावान शिवसैनिकांना मातोश्रीपासून दूर ठेवण्याचे कटाक्षाने प्रयत्न केले, असा आरोप सुषमा अंधारे यांनी केला आहे.

पुण्यातले शिवसैनिक सांगतात, कशा पद्धतीने महापालिका जिल्हा परिषदा निवडणुकांमध्ये नीलम गोरे यांचे भाजपची आर्थिक हितसंबंध जुळायचे आणि इथली शिवसेना त्यांनी कशी बापट सेना करून ठेवली. पुण्यातले बिल्डर व्यापारी यांच्याकडे कलेक्शनला जाणारी माणसं यावर पुण्यातले शिवसैनिक अत्यंत चवीने चर्चा करतात.

पुढे बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, अशा नीलम गोऱ्हेंचे नाव घेतले की मी फार प्रयत्न करते त्यांची एखादी गाजलेली सभा आठवण्याचा. ज्या सभेत त्यांनी अत्यंत घनाघाती भाषण केला असेल. किंवा एखाद प्रचंड मोठे आंदोलन ज्या आंदोलनात त्यांनी लाट्या काठ्या खाल्या असतील. एखादा मोठा भ्रष्टाचार जो त्यांनी प्राणपणाने लढून बाहेर काढला असेल. तर मला असं काहीच आठवत नाही. नीलम गोऱ्हे हे नाव उच्चारले की मला आठवतात, त्यांनी नेसलेल्या महागड्या लफेदार साड्या. हिरे मोती माणिक आणि सोन्याचे मॅचिंग नेकलेस. त्याच्यावर तसेच कानातले डूल. साडीला मॅचिंग अशी महागडी ऐटदार पर्स. तीन-चार मोबाईल. दोन-तीन पीए. कुणाच्या हातात मोबाईल कोणाच्या हातात डायरी तर कुणाच्या हातात मॅडम साठी दोन-चार हातरुमालाच्या घड्या.

आज एका माजी आमदाराने फोन करून सांगितले.. बाय द वे, गोऱ्हे बाईंना चार वेळा आमदारकी मिळाली म्हणजे आठ मर्सिडीज दिल्या असतील. हडपसरच्या डिस्पेन्सरीला प्रॅक्टिससाठी नीलम गोऱ्हे पीएमटीने अर्थात सिटी बसने जा ये करायच्या. पीएमटीने फिरणाऱ्या नीलम गोऱ्हे यांच्याकडे आता महागड्या गाड्या आल्या. नीलम गोऱ्हे यांचे उद्योगधंदे कोणते माहित आहेत का. मला माहित नाहीत.

पण एवढी आर्थिक सुबत्ता आली कशी. नीलम गोऱ्हे तुम्ही अजून कमवा आणि मखलाशा करून अजून पद मिळवा. ज्या पक्षाने तुमचे कर्तृत्व नसताना तुम्हाला मोठे केले त्यांच्यावर बोलताना जरा तारतम्य बाळगा. इतके खोटे लोकांना पचत नाही, अशी टीका सुषमा अंधारे यांनी केली आहे.

## एकनाथ शिंदेंची शिवसेना नाहीतर त्यांची गद्दार सेना : उद्धव ठाकरे

**मुंबई :** एकनाथ शिंदेंची शिवसेना नाहीतर त्यांची गद्दार सेना आहे, तिकडे गेलेल्या लोकांवर मी काहीच बोलणार नाही. ज्यांना मी काही देऊ शकलो नाही, असे जुने शिवसैनिक माझ्यासोबत आहेत, असे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले की, राज्यात आणि देशात जी अराजकता पसरली आहे ती दूर करत आपले खरे हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व याचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. काँग्रेसचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत ठाकरे गटात प्रवेश केला यावेळी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले की, धर्म हा जगायचा असतो सांगायचा नसतो असे संत गाडगेबाबा यांनी म्हटले आहे. त्यांनी सांगितलेली दशसुत्री मी मुख्यमंत्री असताना तो खरा धर्म आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी दुसऱ्या धर्माचा द्वेष करा असे काही शिकवले नाही. जे देशाला आपले मानतात ते आपलेच आहेत.

उद्धव ठाकरे म्हणाले की, धर्माचा ज्यांनी खेळखंडोबा केला आहे त्यांचे राजकारणापुरते मुस्लीम प्रेम कसे आहे याचे मी दाखले तुम्हाला देऊ शकते. निवडणुकीसाठी हे जे सुरू आहे ते देशाला चांगल्या दिशेने नेईल असे मला वाटत नाही. धनंजय मुंडे, माणिकराव कोकाटे यांचे रक्षण करणे हे भाजपचे हिंदुत्व आहे? का असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला आहे. माझ्या हिंदुत्वाची व्याख्या व्यवस्थित आहे भाजपचे काय?

उद्धव ठाकरे म्हणाले की, आमच्याबद्दल ३ वर्षे होऊन सुद्धा न्यायालयाचा निकाल लागत आहे. न्यायाधिशांची कारकीर्द पूर्ण झाली तरी आमचा निकाल लागलेला नाही. याबाबतील निकाल लागला आहे तर प्रत नार्वेकरांना द्यावी.

## नार्वेकरांकडून इमानदार निर्णयाची अपेक्षा करणं म्हणजे रेड्याने दुध देण्यासारखे : संजय राऊत



**मुंबई :** विधानसभा अध्यक्षांनी राजकारण करायला काही हरकत नाही पण आपण संविधानिक पदावर बसलो आहोत आणि आपल्याला या पदावर न्याय करण्यासाठी बसवले गेले आहे. पहिला शिवसेनेच्या बाबतीत नंतर राष्ट्रवादीच्या बाबतीत आणि आता माणिकराव कोकाटे यांच्याबाबतीत त्यांच्याकडून इमानदार निर्णयाची अपेक्षा करण म्हणजे रेड्यानं दुध देण्यासारख आहे, असा टोला ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, भाजपकडे अनेक वेगवेगळे रेडे आहेत. आम्ही कायद्याच्या चौकटीत मागणी करु शकतो आणि भूमिका मांडू शकतो. पण आम्हाला माहित आहे एक बेकायदेशीर सरकार विधानसभा अध्यक्षांच्या पाठिंब्याने चालत, यापेक्षा वाईट संविधानाची तुडवा तुडवी काय असू शकते. राहुल गांधी आणि सुनिल केदार यांच्या वेळेस जसे निर्णय तडकाफडक घेतले गेले, तसे या आमदारांच्या वेळेस का नाही घेत?.

संजय राऊत म्हणाले की, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर दबाव असल्याने ते खोटे बोलत आहे. ह्याच अध्यक्षांवर सुप्रीम कोर्टाने ४० आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात निकाल देण्याची जबाबदारी दिली होती. ते निकाल पत्र वाचताना ते अडखळत होते यावरुन ते कुठून तरी आले होते हे समजते, आणि ते केवळ वाचत होते. तेव्हाच ४० आमदार अपात्र ठरायला हवे होते. त्यांच्याकडून तुम्ही माणिकराव कोकाटे यांच्याबद्दल काय अपेक्षा करणार. ते गेली ४ वर्षे खोटे बोलत आहेत असा टोलाही राऊतांनी नार्वेकरांना लगावला आहे.

संजय राऊत म्हणाले की, राहुल गांधी, सुनील केदार यांच्याबाबतीत २४ तासांत निर्णय घेतल्या गेल्या आता का घेतले जात नाही हेच अध्यक्ष होते ना असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे.

एकनाथ शिंदे एक घाबरलेला माणूस आहे. हे सर्व लाचार लोकं आहेत म्हणून ते काहीही वक्तव्य करतात. अमित शहा ज्यावेळी सत्तेत नसतील तेव्हा खरी शिवसेना आणि खोटी शिवसेना याचा निर्णय होईल, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, आज दहशत, दबाव पैशाचा प्रभाव आणि निवडणूक आयोग आपल्या हातात आहे म्हणून एकनाथ शिंदे यांना पक्ष आणि चिन्ह मिळाले. एकनाथ शिंदेंनी स्वतःचा पक्ष स्थापन करत केवळ ५ आमदार निवडून आणून दाखवावे. अमित शहा, नरेंद्र मोदी अमृत पिऊन आले नाहीत. ते गेल्यावर जनता निर्णय घेईल.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ फेब्रुवारी २०२५


## संत निरंकारी मंडळाकडून मुरूमच्या जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या परिसराची स्वच्छता



मुरूम, ता. उमरगा येथील संत निरंकारी मंडळाकडून जिल्हा परिषद कन्या प्रशालेचा परिसर स्वच्छ करताना पुरुष व माता भगिनी.

**मुरुम, ता. उमरगा, ता. २३ (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन, दिल्ली व मुरुम शाखेकडून संत निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या ७१ व्या जन्मदिनाचे औचित्य साधून संपूर्ण जगात हा दिवस स्वच्छता मोहीम म्हणून साजरा केला जातो.

सद्गुरु माता सुदिक्षा सविंदर हरदेवजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या कृपा आशीर्वादाने रविवारी (ता.२३) रोजी स्वच्छ चल स्वच्छ मन मोहिमेअंतर्गत जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुरूम रोटरी क्लबच्या डॉ. सुवर्णा पाटील होत्या.

यावेळी रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ. नितीन डागा, महाराष्ट्र पत्रकार संघाचे विभागीय उपाध्यक्ष प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, बालाजी व्हनाजे, मुख्याध्यापिका अलका गायकवाड, नळदुर्गचे राजेंद्र पोतदार, प्रा. डॉ. महेश मोटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी कल्लेश्वर पांचाळ, रमेश मिणीयार, तुकाराम शेवाळे, सुरेश कोळी, सुधाकर नारायणकर, हनुमंत पोतदार, प्रा. त्रिंबक व्हटकर, दगडू दिक्षीवंत, लक्ष्मण राठोड, हणमंत मंडले, राजेंद्र सुपेकर, ग्यानप्रकाश यादव, किशोर चव्हाण, परमेश्वर जाधव, महादेव देडे, अमोल कटके आदींनी पुढाकार घेतला. शाळेच्या आतील व बाहेरील परिसरातील झाडे-झुडपे तोडून स्वच्छता सेवादल बिरु बंदीछोडे, दत्ता बोडरे, गुंडेराव चौगुले, प्रमोद नारायणकर, शिवाजी राठोड, विष्णू पवार, बालाजी कसबे, बसवराज बिराजदार, योगेश भोकले, शुभम कोकणे, दयानंद व्हनाळे, प्रसाद सुपेकर, व्यंकट इगवे तर सेवादल बहिणजी अनुसया नारायणकर, अनिता देडे, गुरुदेव बोडरे, मंगल बनसोडे, भाग्यश्री घोडके, श्रध्दा साखरे आदिंनी घनकचरा, गवत, झाडांना आळे, पाणी घालून परिसर स्वच्छ केला. उषा साखरे, मंगल घोडके, सुनिता व्हटकर, अश्विनी पांचाळ, मुक्ताबाई कोळी, भारत बेगमपुरे, बालिका बनसोडे, जयश्री सोनवणे आदिंनी स्वच्छता फलकाचा प्रचार करून स्वच्छतेचा संदेश दिला.

कमल शेवाळे यांच्या गीताने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी नितीन डागा यांनी मनोगत व्यक्त करताना ग्राम स्वच्छतेचे जनक संत गाडगे महाराजांची जयंती व बाबा हरदेवसिंग महाराजांचा जन्मदिवस हा अतिशय योगायोग आहे. संत निरंकारी मंडळाचे स्वच्छता अभियान ही केवळ एक मोहीम नसून समाजसेवेचे आणि नैतिकतेचे एक उत्तम उदाहरणच आहे. गेल्या अनेक वर्षापासून हे स्वच्छता अभियान निरंतर व अखंडपणे चालू असल्याचे समाधान त्यांनी शेवटी व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात सुवर्णा पाटील म्हणाल्या की, माणसाला आतून व बाहेरून मानसिक, आत्मिक समाधान देणारा हा उपक्रम आहे. तरुणांना सामाजिक बांधिलकीची जाणीव व्हावी, शहर व परिसर स्वच्छ व्हावा, हा या अभियानाचा खरा उद्देश आहे. या उपक्रमामुळे पर्यावरण रक्षण, जनजागृती आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होत असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. या अभियानाचे प्रास्ताविकपर मनोगत निरंकारी मंडळाचे मुखी दयानंद साखरे यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. महेश मोटे तर आभार मीरा मोटे यांनी मानले. शहर व परिसरातील बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.

## गझलकार, नाटककार फिरोज काझी यांना " यंग रायटर अवॉर्ड २०२४ पुरस्कार " जाहीर



**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी या संस्थेच्या वतीने देण्यात येणारा बेस्ट यंग रायटर अवॉर्ड २०२४ हा पुरस्कार नाट्य क्षेत्रातील संवेदनशील नाटककार आणि हिंदी-उर्दू गझलकार श्री फिरोज काझी यांना जाहीर झाला आहे. महात्मा गांधी एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी तर्फे दरवर्षी हा पुरस्कार सामाजिक, शैक्षणिक, कला आणि क्रीडा क्षेत्रात काम करणाऱ्या आणि सामाजिक भान जोपासणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. यावर्षीचा हा पुरस्कार आपल्या लेखनातून सामाजिक क्रांती घडविणाऱ्या श्री फिरोज काझी यांना जाहीर झाला आहे.

गझल म्हटलं की प्रियकर प्रियसीच्या प्रेम शृंगार आणि विरहाची एक कथाच असते. फिरोज काझी यांनी आपल्या गझलमध्ये प्रियकर प्रियसीच्या प्रेमाची उत्कटता मांडलेली आहे. परंतु यासोबतच त्यांनी आपल्या गझलमध्ये अनेक सामाजिक मुद्द्यांना देखील स्पर्श केलेला आहे.

त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर, 'ता-उम्र किया हमने सफर फूलों का, इसीलिये है हमपर असर फूलों का।' एकीकडे अशी शृंगारिक उधळण करत असतांनाच हा शायर पुढे महिला अत्याचारावर गंभीर होताना म्हणतो, ' अच्छी सुरत को उसकी खुबसूरती मार गयी, किस्मत वालो को उनकी बद-किस्मती मार गई। मां की कोख से बची तो बहुत खुश हुई थी वो, उस मासूम बच्ची को आज उसकी जवानी मर गई। प्रचंड शब्द साठा, शाब्दिक सौंदर्य आणि मनातील संवेदनशीलतेने १२०० च्या वर गझल लिहून या शायरने आजच्या तरुणाईला सामाजिक भान शिकवले. 'जाने क्यूँ रखते है लोग इसे इतना संभाल के, मुझे भी देखना हैं दिल को बाहर निकाल के।' असं म्हणत हा शायर कधी बेभान होतो तर कधी, ' शर्त मंजिल की रास्तो से लगा के दिखा, जरा गर्दीश के तारों को आजमा के दिखा। मैं गुजरा हूँ जिन हादसों से, तू भी गुजर ज़ा, उसके बाद मेरी तरह मुस्कुरा के दिखा। असं म्हणत आत्मविश्वास हरवलेल्या तरुणांमध्ये ऊर्जा भरण्याचं काम फिरोज काझी यांनी केलं आहे. अपनी उड़ानो में अक्सर ये हौसला रखा हैं, हमने अपनी बाहों में सारा आसमाँ रखा हैं। ये दीवानगी की हद नहीं तो और क्या हैं बता, जिद ऐसी की तुफानो में चिराग जला रखा हैं।

फिरोज काझी रंगभूमीवरील उत्तम नाटककार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'हे राम', 'छत्रपती शिवरायांचा जिहाद', ' सन्माननीय षंढानों' या नाटकातून त्यांनी विविध सामाजिक प्रश्नांना रंगभूमीवर मांडून प्रेक्षकांना रडवले, तर 'थ्री इडियट्स', 'मंगलम गोंधळमं', 'हेराफेरी', 'आम्ही सारे उचपाती' अशा विनोदी नाटकातून त्यांनी रसिकांना खळखळून हसवले आहे. फिरोज मराठी रंगभूमीवरील उत्तम अभिनेते आणि दिग्दर्शक ही आहेत. मराठी हिंदी नाटकातून त्यांना अनेक पुरस्कारही मिळालेले आहेत.

गझल, नाटक, वेब सिरीज, लघुपट, चित्रपट अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी लेखनाचे कार्य केले आहे. त्यांच्या सामाजिक लेखनाची दखल घेत, महात्मा गांधी एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीने त्यांना 'यंग रायटर अवॉर्ड २०२४' हा पुरस्कार जाहीर केला आहे. याबाबतीत आनंद व्यक्त करताना फिरोज काझी म्हणतात, ' माझे कुटुंब आणि माझा मित्र परिवार, आणि मायबाप रसिक प्रेक्षक यांच्याकडूनच मला लेखनासाठी प्रेरणा मिळाली आहे.' अशा अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे सर्व मित्र परिवाराकडून हार्दिक अभिनंदन..

आपल्या लेखनातून तरुणांना प्रेरणा आणि ऊर्जा मिळून सामाजिक क्रांती घडत राहो हीच अपेक्षा, आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.






## कन्नड तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेमध्ये प्रवीण शिंदे, संदीप शिंदे या जोडीला विजेतेपद



**कन्नड :** दौलतरत्न क्रीडा मंडळआयोजित तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित करण्यात आल्या होत्या विनायकराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या इनडोर हॉल मध्ये आयोजित करण्यात आल्या होत्या या स्पर्धेमध्ये तालुक्यातून देवगाव रंगारी येथील खेळाडू उपस्थित होते या खेळाडूंनी अंतिम सामन्यांमध्ये डॉ कैलास मोती अविनाश गायकवाड यांचा पराभूत करून विजय संपादन केले.

यामध्ये देवगाव रंगारी चे खेळाडू अशोक गोसावी भाऊसाहेब होलप ईश्वर ठुबे सचिन वेताळ व कन्नड मधले खेळाडू प्रवीण भदाणे संतोष जंजाळ संदेश राठोड सचिन शेळके चंद्रकांत कोळी विवेक चिंचोले सुरेश डोळस विनोद कुमार सालोंकी राहुल पाटणी सुरज जाधव या स्पर्धेसाठी पंच म्हणून रवी कुमार सोनकांबळे मुक्तानंद गोस्वामी आदींनी पार पाडले यावेळी दौलतरत्न क्रीडा मंडळाचे अध्यक्ष दौलतराव शिंदे व खरेदी विक्री महासंघाचे अध्यक्ष सुरेश डोळस माजी सरपंच वासडी राहुल पाटणी आदींनी खेळाडूंना शुभेच्छा देऊन सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ फेब्रुवारी २०२५


## महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती डोक्यावर घेऊन नव्हे तर डोक्यात घेऊन साजरी करावी यासाठी एक वेगळा प्रयत्न म्हणून आरोग्य सर्व रोग निदान शिबिर आयोजित केला..



**छत्रपती संभाजी नगर :** महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटक माननीय आमदार प्रदीप जयस्वाल साहेब व प्रमुख उपस्थित इतर मागास कल्याण विकास मंत्री अतुल सावे साहेब व महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी. वडमारे हे होते या कार्यक्रमाचे आयोजन महेंद्र गवई सर यांनी केले होते.

कार्यक्रमाचे ठिकाण एन १२ स्वामी विवेकानंद नगर, छत्रपती संभाजी नगर येथील अनेक आपल्या आरोग्याची तपासणी करून नागरिकांनी या शिबिराचा मोठ्या उत्साहात लाभ घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रतन जाधव जिल्हा संघटक, बापूसाहेब चाबुकस्वार जिल्हा सचिव, बंडू तांदळे जिल्हा उपाध्यक्ष, बाळू गायकवाड, पंकज खोतकर, अमोल गळवे, राजू दादा भोसले, आनंद मिसाळ, रत्नदीप बोर्डे, सिद्धार्थ गवई, रोहित भोसले, सुमित वाहुळ, सुमित जाधव, अलकाताई जाधव महिला जिल्हाध्यक्ष, स्वाती घुसळे जिल्हा सचिव, द्वारकाबाई, कोर्तीसाई, शिल्पाताई जाधव खुलताबाद तालुकाध्यक्ष महिला आघाडी या सर्व महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले.

## प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांची छत्रपती संभाजीनगर जिल्हा करियर कट्टा प्राचार्य प्रवर्तक म्हणून नियुक्ती



**पाचोड** - छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील पाचोड येथील शिवछत्रपती कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांची छत्रपती संभाजीनगर जिल्हा करियर कट्टा प्राचार्य प्रवर्तक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात सुरू असणारा करिअर कट्टा या उपक्रमामध्ये आपल्या विभागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा व या उपक्रमाच्या माध्यमातून युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक विविध उपक्रम राबविणे सुलभ व्हावे या उद्देशाने जिल्हा निहाय अनुभवी व कर्तव्य संपन्न प्राचार्य व्यक्तींची निवड केली जाते त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याच्या माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी पाचोड येथील शिवछत्रपती कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांची छत्रपती संभाजीनगर जिल्हा करिअर कट्टा प्राचार्य प्रवर्तक म्हणून २०२५ ते २०३० या पाच वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांची जिल्हा करिअर कट्टा प्राचार्य प्रवर्तक म्हणून पाच वर्षासाठी नियुक्ती झाल्याबद्दल उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, विभागीय संचालक डॉ. रणजितसिंह निंबाळकर, विभागीय प्रवर्तक प्राचार्य डॉ. भारत खंदारे, प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, डॉ. राजेंद्र उढान, डॉ. राजेश लहाने, संभाजीनगर जिल्हा समन्वयक डॉ लक्ष्मीनारायण कुरपटवार, डॉ. वैशाली पेरके, डॉ. तुकाराम गावंडे, डॉ. गांधी बानायत, आदींनी कौतुक केले आहे.






## महादजी शिंदे स्वाभिमानी माणूस; हा पुरस्कार एकनाथ शिंदेंना कसा? विद्रोही साहित्य संमेलनातून अशोक राणांची टीका

**छत्रपती संभाजीनगर :** 'दिल्लीतल्या साहित्य संमेलनात पंतप्रधान मोदींना बोलावलं गेलं. ते प्रधानमंत्री नाही प्रचारमंत्री आहेत. भाजपचे ते प्रधानमंत्री आहेत. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जो पुरस्कार दिला गेला महादजी शिंदे यांच्या नावाने तर महादजी शिंदे कुठे आणि एकनाथ शिंदे कुठे? महादजी शिंदे एक स्वाभिमानी माणूस होता'. विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अशोक राणा बोलत होते. दिव्य मराठी डिजिटलने त्यांच्याशी विशेष संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी दिल्लीतल्या साहित्य संमेलनापासून ते मोदींच्या तेथील उपस्थितीबद्दल टीका केली आहे.

नवी दिल्ली येथे पार पडणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर समांतर, पण वेगळे असे विद्रोही साहित्य संमेलन छत्रपती संभाजीनगरमध्ये सुरु आहे. सांस्कृतिक विचारयात्रेने १९ व्या अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलनाला शनिवारी (दि. २२)सुरुवात झाली. आज संमेलनाचा तिसरा आणि शेवटचा दिवस आहे. विद्रोही साहित्य संमेलनाचे डॉ. अशोक राणा हे अध्यक्ष आहेत. त्यांच्याशी दिव्य मराठी डिजिटलने एक्सक्लूझिव्ह संवाद साधला.

डॉ. अशोक राणा यावेळी बोलताना म्हणाले, 'राजकारणी लोकांनी स्वतःच नम्रतेने साहित्याच्या मंचावर जाणं टाळलं पाहिजे. त्यांना सन्मानाने समोरच्या जागेत बसता येते. परंतु त्यांचा हव्यास, हट्ट किंवा दुराग्रह असतो की आम्ही तुम्हाला मदत करतो तर आमचा हा हक्क आहे.

राजकारणी लोकांना टाळू नये असं म्हणणार एक मोठा वर्ग आहे. दिल्लीच्या संमेलनात त्यांनी पराकोटी केली की प्रधानमंत्री, आरएसएसला तिथे आणलं गेलं. भारतीय जनता पार्टीचा प्रचार त्याठिकाणी सुरु आहे'.

डॉ. अशोक राणा यावेळी बोलताना म्हणाले, 'मुळात हे प्रधानमंत्री प्रधानमंत्री नाहीत. ते प्रचारमंत्री आहेत. ते आरएसएसचे प्रधानमंत्री आहेत.ते भाजप पक्षाचे, अदानी-अंबानीचे प्रधानमंत्री आहेत. ते सर्वसामान्य माणसांचे प्रधानमंत्री नाहीत. भारताचे तर मुळीच नाही. ते भारतात कमी राहतात. परदेशात जास्त फिरतात. जेव्हा जेव्हा फिरतात तेव्हा आपले जे मालक आहेत अदानी-अंबानी यांची जी औद्योगिक व्यवहार आहे आर्थिक व्यवहार आहेत ते सांभाळतात. ते एक प्रकारे त्यांच्या दिवाणजीचं काम करतात. त्यांच्याकडून जास्त अपेक्षा करता येत नाही'.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यंदा दिल्लीत होत आहे. त्या निमित्ताने सरहद संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींचा गौरव करण्यात आला. यावेळी महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार देऊन एकनाथ शिंदे यांचा गौरव करण्यात आला. यावर बोलताना विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अशोक राणा म्हणाले, 'हा तर विकृतीचा कळस आहे. महादजी शिंदे एक स्वाभिमानी माणूस होता. जो पानिपतच्या लढाईत लढला. आणि त्यांना विष देऊन, विष प्रयोग करून त्यांना मारण्यात आलं. आता तो जर पुरस्कार एकनाथ शिंदेला दिला असेल तर त्यांच्या शेवट कसा होईल हे या पुरस्कारातून स्पष्ट होतं. त्यात महादजी शिंदेंचा पराक्रम एकनाथ शिंदेंमध्ये कुठे दिसत नाही. पण त्यांच्यावर विषप्रयोग होईल हे त्यातून सूचित केलं आहे. असं मला वाटतं'.

विद्रोही साहित्य संमेलनातल्या आपल्या अनुभवाविषयी डॉ. अशोक राणा म्हणाले, अनुभव म्हणजे अगदी भारावण्यासारखा आहे. मी आपल्या कुटुंबात आलो असं वाटतं आहे. कारण एवढं एवढी जवळीक साहित्य संमेलनामध्ये साहित्यिकांशी नसते आणि रसिकांशीही नसते.

अगदी तळागाळातील लोक आहेत आज ज्यांना सर्व प्रकारच्या वंचना आहेत ते वंचित आहेत अशाही लोकांची उपस्थिती या ठिकाणी आहे. आणि ते बोलतायेत, ते गातायेत, ते नाचतायेत, व्यक्त होत आहेत. त्यांना व्यक्त होण्यासाठी कोणतेही अडचण या ठिकाणी नाही. हे या विद्रोही साहित्य संमेलनाच एक मोठ यश आहे.

१९वे अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलन शहरात आमखास मैदानावरील मलिक अंबर नगरीत सुरु आहे. यात परिसंवाद, कविसंमेलने, व्याख्यान, गटचर्चा यांची रेलचेल सुरु आहे. शुक्रवारी २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजता 'शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला' या नाटकाच्या प्रयोगाने संमेलनाला सुरुवात झाली.

शनिवारी, २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता औरंगपुरा येथे महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सांस्कृतिक विचारयात्रा निघाली. हिंदी साहित्यिक कंवल भारती यांच्या हस्ते संविधान मंचावर संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. अशोक राणा, प्रा. प्रतिमा परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ फेब्रुवारी २०२५


## बालाजी तांदळेला थर्ड डिग्री दिल्यास सगळेच कळेल : अंजली दमानिया



**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी उलटून गेला आहे. पोलिसांना अद्यापही एक आरोपी सापडलेला नाही. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी हे प्रकरण उचलून धरलेले आहे. आता अंजली दमानिया यांनी या प्रकरणाशी संबंधित एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमधून अंजली दमानिया तपास यंत्रणांवर शंका उपस्थित केली आहे. पोलिसांचा तपास चालू आहे, हे आपल्याला मूर्ख बनवण्यासाठी दाखवल्याचे त्या म्हणाल्या. हे प्रकरण लावून धरले नसते तर कराडला देखील अटक झाली नसती, असा दावाही त्यांनी केला. सध्या अंजली दमानिया यांची ही पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे.

अंजली दमानिया आपल्या सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हणाल्या, धनंजय मुंडे माझे दैवत, वाल्मीक कराड माझे नेते, असे म्हणणारे बाळाजी तांदळे यांना पत्र देऊन, त्यांना बरोबर घेऊन, त्यांच्याच जवळच्या मित्रांचा, जे खुनाचे आरोपी आहेत, ह्यांना घेऊन पोलिस शोध करू शकतात का? जे पकडले गेले, ते "मुद्दाम पकडवून, बळी दिले गेले"ह्यात शंका आहे का? म्हणूनच कराड फरार राहू शकले आणि आपल्याला मूर्ख बनवण्यासाठी दाखवले गेले की पोलिसांचा तपास चालू आहे. जर प्रकरण लावून धरले नसते तर कराडला देखील अटक झाली नसती.

बालाजी तांदळे, जो जमिनीचा बंदोबस्त करतो, प्रत्येक स्थळी उपस्थित असतो, तो शोधले आरोपींना? ह्याची नुसती चौकशी करून त्याला सोडून दिले? असेही त्या म्हणाल्या. ह्याला जर थर्ड डिग्री वापरून चौकशी केली, तर कळेल सगळे कुणाच्या सांगण्यावरून होत होते. पीआय गोसावी आणि भागवत शेलार यांचे सीडीआर जाहीर करा, अशी मागणीही अंजली दमानिया यांनी केली. पहिल्या दोन आरोपींची TIP कुणाकडून आली? देवेंद्र फडणवीस आता तरी काही बोलणार का? अजून त्यांना गरज वाटत नाही? असा सवाल दमानिया यांनी उपस्थित केला.

दरम्यान, अंजली दमानिया यांनी याच महिन्यात एका पत्रकार परिषदेत इफकोमध्ये होणाऱ्या भ्रष्टाचाराचा देखील मुद्दा उपस्थित केला. कृषी घोटाळा नंबर २ चा उल्लेख करत, यामध्ये धनंजय मुंडे कोणत्याही पद्धतीने वाचत नाहीत असेही त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे यांचे एक पत्र माध्यमांना दाखवले. हे पत्र मंत्र्यांनी लिहिलेले आहे पण त्यावर तारीख टाकण्यात आलेली नाही असेही त्यांनी सांगितले होते. पत्र वाचून दाखवत अंजली दमानिया म्हणाल्या की, दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीतील विचारार्थ ठेवण्यात आलेला, मंजूर झालेला कृषी विभागाच्या प्रस्तावाचे इतिवृत्त कायम करण्यात आला असे पत्रात लिहिले आहे. पण अंजली दमानिया यांनी असा कुठलाही निर्णय झाला नसल्याचा दावा केला. याचा अर्थ हा मंत्री कोणत्या थराला जाऊ शकतो याचे हे उदाहरण आहे. २३ आणि ३० तारखेला कुठल्याही प्रकारचा असा निर्णय झालेला नाही, असे अंजली दमानिया यावेळी सांगितले होते.

## जीवनात यशस्वी होण्यासाठी वेळेचे योग्य नियोजन करावे : रितेश मिश्रा




**जालना :** वेळ हा मिळत नसतो तो काढावा लागतो, दिवसभराचे काटेकोर नियोजन केल्यास जीवनात पुढे जाऊन यशस्वी होण्यापासून तुम्हाला कोणीच रोखू शकणार नाही. श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालय समिती आपल्या पाठीशी नेहमी खंबीरपणे उभी आहे. विद्यार्थीनीनो, विविध कौशल्य आत्मसात करा, तुमच्या घरापर्यंत जॉब तुम्हाला शोधत येईल. उत्कृष्ट मनुष्यबळ सामाजिक विकास व राष्ट्राच्या उन्नतीसाठी फार महत्वाचे आहे आणि ते तुमच्या सारख्या युवाशक्तीतच आहे असे प्रतिपादन महिकोचे संचालक रितेश मिश्रा यांनी केले.

जालना शहरातील श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयाच्या वार्षिक कला - क्रीडा महोत्सव समारोपप्रसंगी मिश्रा बोलत होते. मिश्रा म्हणाले, शहरात विविध ठिकाणी सार्वजनिक जागा, स्मारके याठिकाणी आपल्या कल्पकतेने रंगरंगोटी करून प्रत्येक नागरिकांच्या मनात संस्कृतीचे विविध रंग भरविण्याची ताकत तुमच्यात आहे. "श्री एच" म्हणजे हॅन्ड, हर्ट आणि हेड यांच्या विकासासाठी वार्षिक कला - क्रीडा महोत्सव महत्वाचा असतो, त्यामुळे अशा कार्यक्रमाला उपस्थित राहणे मी माझे भाग्य समजतो. आज भारतात 40 टक्के युवाशक्ती आहे. या शक्तीचा विधायक वापर केला तर आपण सर्व जण यशाच्या शिखरावर नक्की पोहचू, त्यासाठी नवीन कौशल्य आत्मसात करण्याचा सल्लाही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला.

प्राचार्यांनी विविध विभागाच्या वर्षभरातील कार्यक्रमाच्या अहवालाचे वाचन केले. संस्थेचे अध्यक्ष महेंद्रकुमार गुप्ता यांनी सर्व मुलींना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी मंचावर संस्थाध्यक्ष महेंद्रकुमार गुप्ता, उपाध्यक्ष गणेश अग्रवाल, कोषाध्यक्ष संजय अग्रवाल, संचालक विनोदी अग्रवाल, व्यवस्थापन समितीचे इतर पदाधिकारी आदी उपस्थित होते.

13 ते 20 फेब्रुवारीपर्यंत क्रीडा महोत्सवांतर्गत उपक्रम स्पर्धेत सहभागी विद्यार्थीनींना प्रमाणपत्र व बक्षीस देण्यात आले. दरम्यान, 13 ते 20 फेब्रुवारीपर्यंत महाविद्यालयात कला- क्रीडा महोत्सवांतर्गत विविध उपक्रम घेण्यात आले. तर या वर्षीचे वार्षिक कला- क्रीडा संमेलन हे "श्री एच" या थीमवर पूर्णपणे उभारले होते. यात सुरुवातीपासूनच विद्यार्थिनींच्या कला गुणांना वाव देण्यासाठी भरगच्च कार्यक्रम घेण्यात आले.

## नर्गिस फाखरीने तिच्या जुन्या प्रियकराशी गुपचूप लग्न केले!



**मुंबई :** अभिनेत्री नर्गिस फाखरीने तिचा जुना प्रियकर टोनी बेगशी लग्न केले आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, दोघांनी नुकतेच लॉस एंजेलिसमध्ये गुपचूप लग्न केले. फक्त कुटुंब आणि जवळचे मित्र त्यात सहभागी झाले होते. आता हे जोडपे स्वित्झर्लंडमध्ये त्यांचा हनिमून साजरा करत आहे. तथापि, या प्रकरणावर नर्गिसकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

नर्गिस फाखरी आणि टोनी बेग यांचे काही फोटो Bolly Blinds N Gossip ने Reddit वर शेअर केले आहेत. यामध्ये त्यांच्या लग्नाचा केक दिसत आहे, ज्यावर हॅपी मॅरेज लिहिलेले आहे. यासोबतच दोघांनीही स्वाक्षरी केली आहे.

टोनी बेग हा काश्मीरमधील एक व्यापारी आहे. दोघेही पहिल्यांदा एका पार्टी दरम्यान भेटले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, नर्गिस आणि टोनी २०२२ पासून एकमेकांना डेट करत आहेत.

नर्गिसने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर स्वित्झर्लंडचे अनेक फोटो शेअर केले आहेत. याशिवाय, अभिनेत्री टोनीच्या स्टोरी पुन्हा शेअर करत आहे. यामुळे सोशल मीडिया वापरकर्ते असे म्हणू लागले आहेत की दोघांनी खरोखर लग्न केले आहे. आता ते त्यांचा मधुचंद्र एन्जॉय करत आहेत.

उदय चोप्राने २०१३ मध्ये नर्गिस फाखरीला डेट करायला सुरुवात केली. पाच वर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर, २०१७ मध्ये दोघांचे ब्रेकअप झाले. तथापि, एका मुलाखतीत उदयसोबतच्या तिच्या नात्याबद्दल बोलताना तिने म्हटले होते- 'उदय आणि मी ५ वर्षे डेट करत होतो आणि तो भारतात मला भेटलेला सर्वात सुंदर माणूस होता. मी हे कधीच मीडियासमोर बोलले नाही, कारण लोकांनी मला माझे नाते लपवून ठेवण्यास सांगितले होते, पण मला त्याचा पश्चाताप होतो.

## नीलम गोऱ्हेंच्या विधानानंतर ठाकरे गट आक्रमक




**पुणे :** अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बोलताना ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळायचे, असे खळबळजनक वक्तव्य नीलम गोऱ्हे यांनी केले आहे. त्यांच्या या मोठ्या दाव्यानंतर आता ठाकरेंच्या शिवसेनेतील नेते पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात पुण्यात ठाकरेंची शिवसेना आक्रमक झाल्याचे दिसून आले. नीलम गोऱ्हे यांच्या पुण्यातील घराबाहेर ठाकरेंच्या शिवसैनिकांनी आंदोलन केले आहे.

नीलम गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरें यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याचा निषेध व्यक्त केला आहे. ठाकरे यांच्या पक्षातील महिला शिवसैनिकांनी नीलम गोऱ्हे यांच्या घरासमोर आंदोलन केले. यावेळी महिलांनी नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात घोषणाबाजी करण्यात आलीय. महिलांनी हातात टायर आणि मर्सिडीज गाड्याचे पोस्टर आणले होते त्यावरती टायरवाल्या काकू असे लिहण्यात आले होते. यावेळी बोलताना महिला महिला म्हणाल्या, नीलम गोऱ्हे यांनी मुलाखतीमध्ये पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचा अपमान केला आहे, त्यांनी गंभीर आरोप केले आहेत. गोऱ्हेंनी आत्तापर्यंत पदासाठी किती गाड्या दिल्या त्याच्या पावत्या त्यांनी द्याव्या, असेही या ठाकरे गटाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

यावेळी संतप्त महिला कार्यकर्त्यांनी खेळण्यातील मर्सिडीज गाड्या दाखवत नीलम गोऱ्हे तुम्ही आता यातून फिरा म्हणत हल्लाबोल केला आहे, तर वाढदिवसाच्या वेळी नीलम गोऱ्हे आम्हाला सामान्य कार्यकर्त्यांना मांडव घालायला सांगतात, एलईडीच्या माळा लावायला लावतात. प्रत्येक वेळी तिकीट देताना पैशाची मागणी करतात, त्या नीलमताई आता यावर बोलतील का म्हणत महिलांनी घोषणाबाजी केली. त्या जोड्यांनी मारण्याच्या लायकीच्या आहेत असे म्हणत महिलांनी त्यांच्या फोटोला तुडवले. यावेळी महिला पदाधिकारी मोठ्या आक्रमक झाल्याच्या दिसून आल्या. काही महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

नीलम गोऱ्हे भेटीसाठी महिलांकडून गिफ्ट घ्यायच्या. त्या आम्हाला वेळ देण्यासाठी आमच्याकडून साडी घ्यायच्या, त्यांनी आमच्याकडून दहा ते पंधरा हजारांची साडी देखील घेतली असा आरोप देखील महिला पदाधिकाऱ्यांनी केला आहे. त्याचबरोबर त्यांच्या वाढदिवसाला आणि इतर पदासाठी देखील वेगवेगळ्या गोष्टी घ्यायच्या अशी माहिती त्यांनी यावेळी दिली आहे.